# “गुरुकृपेची उदारता” डेव्हिड कॅटझ् यांच्याद्वारे लिखित व्याख्यानाचा परिचय

‘गुरुकृपेची उदारता’ हे डेव्हिड कॅटझ् यांनी दिलेले एक व्याख्यान आहे, जे त्यांनी १६ जुलै, २०१९ला, पौर्णिमेच्या दिवशी, गुरुपौर्णिमेच्या सन्मानार्थ आयोजित सिद्धयोग महोत्सव सत्संगात दिले होते. या सत्संगाचे थेट प्रसारण सिद्धयोग मार्गाच्या वेबसाइटवरून करण्यात आले होते.

डेव्हिड कॅटझ् शिकवतात की, एका विद्यार्थ्याच्या अंतरी गहन रूपांतरण घडवून आणण्यासाठी गुरुकृपेचे महत्त्व अगाध आहे; श्रीगुरूंच्या शिकवणींच्या अभ्यासाप्रति समर्पित असलेल्या विद्यार्थ्यामध्ये या रूपांतरणामुळे भगवंताची उपस्थिती प्रकट होते. श्रीगुरूंच्या असीम कृपेप्रति कृतज्ञतावश, हा विद्यार्थी स्वाभाविकपणे अर्पण करतो, तो श्रीगुरूंना प्रेमपूर्ण भेट अर्पित करतो.

हे व्हिडीओ रेकॉर्डिंग आणि डेव्हिड कॅटझ् यांचे व्याख्यान, तुमच्या अध्ययनासाठी आणि मननासाठी इथे उपलब्ध आहेत.

©२०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.